एसटीच्या दक्षता अधिकारीपदी प्रियांका नारनवरे

प्रशासकीय सोपस्कारांनंतर स्वीकारला पदभार

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाच्या मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी या महत्त्वपूर्ण पदावर उपमहानिरीक्षक दर्जाच्या आयपीएस अधिकारी प्रियांका नारनवरे यांनी सोमवारी कार्यभार स्वीकारला. महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित प्रशासकीय सोपस्कारांनंतर त्यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला.

राज्यभरात दररोज लाखो प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासाची जबाबदारी पार पाडणाऱ्या महामंडळात सुरक्षा व दक्षता विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. महामंडळाची मालमत्ता, उत्पन्न स्रोतांचे संरक्षण, तिकीट व महसूल गैरव्यवहारांना प्रतिबंध तसेच अंतर्गत प्रशासकीय शिस्त आणि पारदर्शकता राखण्याची जबाबदारी या विभागावर असते. गेली अनेक वर्षे रिक्त असलेल्या या मुख्य सुरक्षा आणि दक्षता अधिकारी पदावर शासनाने संबंधित पोलिस अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पाठपुरावा केला होता. त्यानुसार शासनाने उपमहानिरीक्षक दर्जाच्या आयपीएस अधिकारी प्रियांका नारनवरे यांची एसटी महामंडळाच्या मुख्य सुरक्षा आणि दक्षता अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

प्रियांका नारनवरे या अनुभवी आणि कर्तव्यदक्ष आयपीएस अधिकारी असून, पोलिस प्रशासनातील त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ एसटी महामंडळाच्या सुरक्षा व्यवस्थेला आणि दक्षता यंत्रणेला निश्चितच होणार आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे महामंडळातील प्रशासकीय शिस्त, पारदर्शकता आणि कार्यक्षमता अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केली आहे. नारनवरे यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा व दक्षता विभाग अधिक गतिमान, प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने कार्य करेल, असा विश्वास परिवहन मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

कौटुंबिक वादातून चार चिमुकल्यांना विहिरीत फेकून पित्याची आत्महत्या

जळगाव जामोद तालुक्यातील घटना : पती-पत्नीच्या कलहातून उचलले टोकाचे पाऊल

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव जामोद (जि. बुलढाणा) : तालुक्यातील राजुरा बु. शिवारात कौटुंबिक वादातून एका पित्याने टोकाचे पाऊल उचलत त्याच्या चार निष्पाप चिमुकल्यांना शेतातील विहिरीत फेकून स्वतःही आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना सोमवारी उघडकीस आली.

स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय मुसा किराडिया (वय ३०) याने रविवारी सायंकाळी पत्नी रिनाला तिच्या माहेरी इस्लामपूर (ता. जळगाव जामोद) येथे सोडले. त्यानंतर रात्री विजयने प्रीत (वय ७), प्राची (५), पूर्वी (४) व पीयूष (दीड वर्ष) या चौघांना विहिरीत फेकले व स्वतः विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. पती-पत्नीमधील कौटुंबिक वादातून विजयने टोकाचे पाऊल उचलले असावे, अशी शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

सोमवारी सकाळी विजयचे वडील मुसा हे शेतातील विहिरीवर पाणी काढण्यासाठी गेले होते. तेव्हा विहिरीत त्यांना तीन बालकांचे मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसले. आपल्या नातवांचे मृतदेह विहिरीत तरंगत असल्याचे बघून त्यांनी एकच हंबरडा फोडला. त्यांचा आक्रोश ऐकून परिसरातील ग्रामस्थ घटनास्थळी धावून आले. ग्रामस्थांच्या मदतीने विहिरीत शोध घेतला असता मुलासह चार नातवांचे मृतदेह आढळल्याने मुसा यांच्यावर दुःखाचा डोंगरच कोसळला.

विहिरीजवळ आढळली विषाची बाटली

पोलिसांना विहिरीच्या काठावर विषाची बाटली आढळून आली. त्यामुळे आत्महत्येपूर्वी विजयने विष प्राशन केले का, या अंगानेही पोलिस तपास करत आहेत. प्राथमिक पाहणीत विजयने गळफास घेतल्याचे दिसून येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून विविध पुरावे ताब्यात घेतले असून, नेमकी घटना कशी घडली याचा उलगडा फॉरेन्सिक अहवालानंतरच होईल, असे पोलिसांनी सांगितले.

२८ मे रोजी आयोजित सीयूईटी-यूजी परीक्षा पुढे ढकलली; नव्या तारखा लवकरच

बकरी-ईदच्या सुटीमुळे घेतला निर्णय

नवी दिल्ली : राष्ट्रीय टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) २८ मे रोजी होणारी 'सीयूईटी-यूजी २०२६' परीक्षा पुढे ढकलण्याची घोषणा केली आहे. बकरी-ईदच्या सुटीच्या तारखेत बदल झाल्याने हा निर्णय घेण्यात आला. या दिवशी दोन्ही सत्रांमध्ये परीक्षा होणार होती.

कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने २२ मे रोजी जारी केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने हा निर्णय घेतला. या आदेशात सुटीची सुधारित तारीख नमूद करण्यात आली होती.

२८ मे २०२६ रोजी दोन्ही सत्रांमध्ये होणारी ही प्रवेश परीक्षा पुढे ढकलण्यात येत असल्याचे स्पष्ट करून परीक्षेच्या नव्या तारखा लवकरच जाहीर केल्या जातील, असे एनटीएने म्हटले आहे. विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळ नियमितपणे तपासावे व कोणत्याही माहितीसाठी एजन्सीच्या हेल्पडेस्कशी संपर्कात राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

धुळे महामार्गावर भीषण तिहेरी अपघात; ६ ठार

(पान १ वरून) चुकीच्या दिशेने येणाऱ्या वाळूच्या डंपरने समोरून येणाऱ्या मद्य वाहतूक करणाऱ्या ट्रकला जोरदार धडक दिली. मदतकार्य सुरू असताना मुंबईकडून इंदूरच्या दिशेने जाणारी खासगी लक्झरी बस थेट या वाहनांवर येऊन धडकली. टोलनाक्यावरील कर्मचारी आणि इतर वाहनचालक अपघातग्रस्त वाहनांमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी धावले. त्याचवेळी इंदूरच्या दिशेने भरधाव जाणारी ट्रॅव्हल्स लक्झरी बस थेट अपघातग्रस्त वाहनांवर येऊन धडकली. या दुसऱ्या धडकेमुळे मदतकार्यात गुंतलेले लोक चिरडले गेले.

यात लक्झरी बसचालक जावेद खान (वय ४३, रा. बडवानी, मध्य प्रदेश), डंपरचालक मनोज नरवाळ (३२, रा. टोकरे, मालेगाव), टोल कर्मचारी गणेश हिरामण थोरात (३५, रा. हटकरवाडी, चितोड रोड, धुळे), ट्रॅव्हल्समधील अमीर सगीर कुरेशी (२९), समीर कुरेशी (३२, दोघे रा. आनंदबेडी पिंप्री, जि. बडवाणी) आणि ट्रकचालक योगेश पंडित मंडलिक (३४, रा. सोयगाव, ता. मालेगाव) या सहा जणांना मृत्यू झाला.

आंबेनळी घाटात १ हजार फूट खोल दरीत मोटार कोसळली; ८ तरुण ठार

(पान १ वरुन...) नितीन किसन नायकोंडे (३५, रा. पुसेगाव, ता. खटाव), उत्कर्ष आनंद शिंगटे (२१), अनिल अभिमन्यू शिंगटे (२५, दोघेही रा. मर्ढे, ता. सातारा), महेश अनिल पवार (२५), रितेश राजेंद्र लोखंडे (२५), आदित्य अशोक साळुंखे (२१), सुहास जितेंद्र लोखंडे (२०), अंश समीर चव्हाण (१८, सर्व रा. आसगाव, पुनर्वसित, ता. सातारा) अशी अपघातात मृत्यू झालेल्या तरुणांची नावे आहेत.

अपघातानंतर सर्व तरुणांचे मोबाइल बंद झाले. तरुणांचे कुटुंबीय त्यांना फोन करत होते. परंतु फोन लागत नव्हते. त्यानंतर कुटुंबीयांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी महाबळेश्वर ट्रेकर्स आणि इतर स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने तपास सुरू केला. आंबेनळी घाटात मोबाइलचे शेवटचे लोकेशन दिसून आले. रविवारी रात्री साडेदहा वाजता घाटातील एका वळणावर गाडीच्या टायरचे व्रण दिसले. तेथूनच गाडी खाली कोसळल्याच्या खुणा आढळून आल्या.

सर्व तरुण एकुलते एक : या दुर्घटनेतील सर्व युवक हे आई-वडिलांना एकुलते एक होते. अंश चव्हाण हा सध्या चिपळूण येथे आई-वडिलांसह राहत होता. आपल्या मामाच्या गावी म्हणजे आसगाव येथे तो उन्हाळी सुटीसाठी आला होता.

यानंतर महाबळेश्वर ट्रेकर्स, रायगड, महाड येथील ट्रेकर्स व शिवेंद्रसिंहराजे रेक्स्यू टीमचे जवान दोरीच्या साह्याने दरीत उतरले. त्यावेळी तरुणांचे छिन्नविच्छिन्न स्थितीत मृतदेह पडलेले त्यांना दिसले. गाडीचा तर अक्षरशः चक्काचूर झाला होता.

दरीतून मृतदेह बाहेर काढताना कसरत

मृतदेह दरीतून वर काढण्यासाठी चार ट्रेकर्स प्रयत्न करत होते. रविवारी मध्यरात्रीपासून ते सोमवारी दुपारी साडेबारापर्यंत सर्व मृतदेह वर काढण्यात ट्रेकर्सच्या जवानांना यश आले. स्ट्रेचरवर मृतदेह ठेवून दोरीच्या साह्याने वर खेचत हळूहळू सर्व मृतदेह वर आणले.

Office of the District Collector, Solapur and Returning Officer,

SPG Multi-State Cooperative Credit Society Ltd., Natepute, Plot No. 1011/5, Dahigaon, Tal. Malshiras, Dist. Solapur.

NOTICE OF ELECTION

(ONLY FOR MEMBERS)

(As per Multi-State Co-operative Societies Act, 2002 (Amendment 2023) and MSCS Rules 2002 (Amendment 2023))

Notice is hereby given that, as per Cooperative Election Authority, New Delhi, Order No. CEA-12011/515/2026 Dated 13th April 2026, **Election is to be held for Board of Directors and Office Bearers of SPG Multi-State Cooperative Credit Society Ltd., Natepute, Plot No. 1011/5, Dahigaon, Tal. Malshiras, Dist. Solapur.**,

* The number and type of "Board of Directors" to be elected	:	11 (General - 08, SC/ST- 01, Women – 02)
* The number and type of "Office Bearers" to be elected	:	02 (Chairman - 01 and Vice- Chairman- 01)
* Office address of Returning Officer (RO)	:	Office of the District Collector, Solapur, New Collector Office, Sat Rasta, Vijapur Road, Solapur-413003.

Election Schedule

Election Programme for "Board of Directors"

SL No.	Particulars	Date	Time	Place
1	Publication of Provisional List of Members & Delegates, Eligible to Vote	2nd June, 2026 (Tuesday)	By Evening	Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society, Website.
2	Time Window for Raising Objection to the Provisional List	3rd June, 2026 to 6th June, 2026 (Wednesday to Saturday)	11:00 a.m. to 3:00 p.m.	RO Office
3	Secrutiny of objection received to the Provisional List (if any)	8th June 2026 to 12th June 2026 (Monday to Friday)	11:00 a.m. to 3:00 p.m.	RO Office
4	Publication of Final List of Members & Delegates, Eligible to Vote	13th June 2026 (Saturday)	By Evening	Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society, Website.
5	Issue and filing of Nomination Form	22nd June 2026 to 25th June 2026 (Monday to Thursday)	11:00 a.m. to 3:00 p.m.	RO Office
6	Publication of List of Nominations Received	25th June 2026 (Thursday)	By Evening	Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society, Website.
7	Scrutiny of Received Nomination Forms	27th June 2026 (Saturday)	11:00 a.m onwards	RO Office
8	Publication of List of Valid Nominations	27th June 2026 (Saturday)	Immediately after scrutiny	Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society, Website.
9	Withdrawal of Nomination	28th June 2026 (Sunday)	11:00 a.m. to 3:00 p.m.	RO Office
10	Publication of Final List of Contesting Candidates	28th June 2026 (Sunday)	By Evening	Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society, Website.
11	Date of Polling, if Necessary	12th July 2026 (Sunday) — and all those who have entered polling station at 04:00 p.m. or before, Should be allowed to cast vote	8:00 a.m. to 04:00 p.m.	Place will be Announced later
12	Counting of votes	15th July 2026 (Wednesday)	8:00 a.m. Onwards	Place will be Announced later
13	Declaration of Result of "Board of Directors"	After aprroval of Co-Operative Election Authority, New Delhi on Format 19M		

Election programme for "Office Bearer"

	Particulars	Date	Time	Place
1	Announcement of Election Schedule	23rd July, 2026 (Thursday)	After Declaration of Result of Board of Directors Election.	
	1] Time window for filling nomination		09:00 a.m. to 11:30 p.m.	RO Office
	2] Scrutiny of nomination papers		12:30 p.m to 02:00 pm.	RO Office
	3] Time and date for withdrawal		02.00 p.m. to 04.00 p.m.	RO Office
	4] Display of list of the contesting candidate and schedule of election		By Evening	Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website
2	Meeting of Newly Constituted Board and Publication of Valid Nominations, Polling (if required)	24th July, 2026 (Friday)	11:00 a.m. Onwards	Place will be Announced later
3	Declaration of Result of Election of Office Bearers	On or before 31st July, 2026 After approval of Co-Operative Election Authority, New Delhi on Format 19N		

1] MSCS Rule 19(1) and the relevant clauses of the Bye-laws of the SPG Multi-State Cooperative Credit Society Ltd. state that only members registered in the final voter list shall be eligible to vote in the said election.
2] The Provisional List of members will be available for inspection at the RO/ARO office, the registered office of the SPG Multi-State Cooperative Credit Society Ltd., all of its branch offices, and the Society's website.
3] A copy of the final voters list will be supplied to any member or delegate upon payment of the fee specified by the society's Board of Directors.
4] It is mandatory for the candidate, proposer, and seconder to be members of the SPG Multi-State Cooperative Credit Society Ltd., and their names must be included in the final voter list.
5] It is mandatory for the candidate, or a person authorized by them, or their nominee, to file a nomination form in the prescribed format—'Form III' for the Board of Directors and 'Form V' for Office Bearers—with the Returning Officer or Assistant Returning Officer within the prescribed time limit.
6] To be eligible to contest elections for the Board of Directors and as an Office Bearer, a candidate must fulfill the criteria under Sections 29, 43, and 44 of the Multi-State Cooperative Societies Act, Rules 19J, 19K, and 19L of the MSCS Rules, and the bye-laws of the SPG Multi-State Cooperative Credit Society Ltd.
7] An election deposit of Rs. 2,000/- (Rs. 500/- for Scheduled Castes and Scheduled Tribes candidates) is mandatory, and the receipt for this deposit must be attached to the nomination paper.
8] A candidate filing a nomination form under a reserved category (SC/ST/NT/OBC) must attach a self-attested copy of their caste certificate to the nomination form.
9] A candidate, their nominee, or their authorized representative (authorized in writing by the candidate) may give a written notice of withdrawal of candidature to the Returning Officer or Assistant Returning Officer within the prescribed time.
10] All contesting candidates must submit the details of their election expenses to the RO/ARO as per the provisions of MSCS Rules 19(U), (V), (W), and (X), and strictly adhere to the code of conduct.

Place : Solapur
Date : 25 May, 2026

Karthikeyan S, IAS
Returning Officer
SPG Multi-State Cooperative Credit Society Ltd.
And District Collector, Solapur.

श्री शांतिनाथय नमः

शांतिविधान पूजा

स्व. श्रीमती सिंधुबाई विलास पलसे
मृत्यू दि. १४.५.२०२६

आमच्या सासूबाई श्रीमती सिंधू विलास पलसे यांचे देवलोक गमन प्रीत्यर्थ तेरावी दिवशी
"शांतिविधान पूजा"
आयोजित केली आहे.
दि. २६/५/२०२६ मंगळवार सकाळी ८ वाजता.
स्थळ : बुधले गल्ली, सोलापूर

राजेंद्र मनोहर पलसे
समस्त पलसे परिवार
● शहा ● शिरशाड ● दोभाडा ● कल्याणकर

पीएम श्री केंद्रीय विद्यालय, सीआर सोलापूर
Email : kvsolapur1@gmail.com

प्रवेश हेतु आमंत्रण

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ के लिए कक्षा १० एवं १२ में रिक्त सीटों के लिए आवेदन पत्र आमंत्रित किये जा रहे हैं।
पंजीकरण की अवधि : २६.०५.२०२६ से २९.०५.२०२६ तक।
अधिक जानकारी के लिये https://sholapur.kvs.ac.in देखें।

सही/– प्राचार्य

महाराष्ट्र शासन
शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था,
(निपट निरंजन नगर), छत्रपती संभाजीनगर
प्र. संचालक : डॉ. राजेंद्र आ. सातपुते ईमेलः director@gifsa.ac.in, gifsa२००९@gmail.com
web www.gifsa.ac.in
फोन / फॅक्स नं. ०२४०-२४००२१९

प्रवेश (२०२६-२७)

प्रस्तुत संस्थेतील पदवी B.Sc. Forensic Science प्रथमवर्ष, पदव्युत्तर पदवी M.Sc. Forensic Science व पदव्युत्तर पदविका P.G. Diploma in Forensic Science & Related Law व P.G. Diploma in Digital & Cyber Forensic & Related Law (एक वर्ष) या अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रवेशाकरिता https://registration.gifsa.ac.in या संकेतस्थळावर Online पद्धतीने पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तसेच M.Sc. Forensic Science अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता CET परीक्षा होणार आहे याची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी संकेतस्थळ www.gifsa.ac.in पाहावे.

स्थळ – छत्रपती संभाजीनगर
दिनांक : २५/०५/२०२६

स्वाक्षरित/-
प्र. संचालक

जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांना विशेषतः ता. उत्तर सोलापूर मौजे बीबी दारफळ येथील लोकांना कळविण्यात येते ते येणेप्रमाणे- मिळकतीचे वर्णन :- अ) डि. ।। व सब डि ।। सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूरपैकी मौजे बीबी दारफळ येथील जमीन गट नं. ३७०/१/ब यांसी क्षेत्र ० हे. ८१ आर यांसी आकार ०२ रु. २० पैसे या वर्णनाची जमीन महादेव वसंत मस्के आणि तेजश्री बिरुदेव कचरे यांच्या नावे आहे. तसेच ब) मौजे बीबी दारफळ येथील जमीन गट नं. ३७१/१/ब यांसी क्षेत्र ० हे. ८१ आर यांसी आकार ०२ रु. ०२ पैसे या वर्णनाची जमीन राजश्री सुभाष नरोटे, जयश्री पंडीत नरोटे, संजय श्रीरंग देवकते, सुचित्रा दत्तात्रय पाटील, सुवर्णा वसंत हजारे, सारीका विश्वनाथ गोरे यांच्या सामाईक क्षेत्रातील आहे. तसेच क) मौजे बीबी दारफळ येथील जमीन गट नं. ३८३/२ यांसी क्षेत्र ० हे. ८२ आर यांसी आकार ०२ रु. ४० पैसे या वर्णनाची जमीन दिग्वीजय संजय देवकते यांच्या नावे आहे. तसेच ड) मौजे बीबीदारफळ येथील जमीन गट नं. ३७१/१/अ यांसी क्षेत्र ० हे. ८१ आर, यांसी आकार ०२ रु. ०३ पैसे या वर्णनाची जमीन दिग्वीजय संजय देवकते यांच्या नावे आहे. तसेच इ) मौजे बीबीदारफळ येथील जमीन गट नं. ३७०/१/ब यांसी क्षेत्र ३ हे. ३१ आर यांसी आकार ०६ रु. ६५ पैसे या वर्णनाची जमीन सुवर्णा वसंत हजारे यांच्या नावे आहे. तसेच आमचे अशिलांनी इसारा दिला असून सदरच्या शेतजमिनी या निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिल मनोज बळीराम बेडगे, सुरज मधुकर टकले यांना दिलेली आहे. तरी वर नमूद शेतजमिनींवर कोणाचाही, कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲण्ड लायसन्स, बक्षीस, इसारा पावती, साठे खत, खरेदी खत, पोटगी, टाच, जप्ती (right of interest) व इतर कोणत्याही स्वरुपाचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही, कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (०७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी, कोणाचेही, कसलीही तक्रार व हरकत न आल्यास ते सदरची शेतजमिनी या संपूर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे गृहित धरुन आमचे अशील पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलांवर व सदर शेतजमिनीवर बंधनकारक राहणार नाही. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली दि. २५/०५/२०२६

सही/– ॲड. बी.आर. पवार,
बी. ए. (ऑ.), एलएल. बी., ॲडव्होकेट
रा. ५२२/२/३/४, स्वराज्य विहार, वसंत विहारजवळ, घर नं. ७९, जुना पुना नाका, सोलापूर.
मो. नं. 9860804520.
अशिलातर्फे ॲडव्होकेट

सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर येथील लोकांस या सावधानतेच्या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूरपैकी तालुका उत्तर सोलापूरमधील कसबे सोलापूर येथील सोलापूर महानगरपालिका हद्दीतील विडी घरकुल विभागातील गोंधळी वसाहतीमधील घरजागा त्यांचे सर्व्हे नं. १०१/२/ब/१ मधील प्लॉट नं. ४६ याचे क्षेत्र १४८.६९ चौ. मी. याची हद्द ४० x ४० म्हणजे १६०० चौ. फूट इतके असून त्यात पन्हाळी पत्रे असलेल्या पाच खोल्या असून नळ व लाईट कनेक्शनसह असलेली घरजागा यांसी सोलापूर महानगरपालिका मिळकत क्रमांक ३२२३५७ असा असून येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत आतील सर्व तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीच्या हक्कासह. सदरची मिळकत कै. संभाजी शिवाजी वाघमारे मालकी कब्जे वहिवाटीची असून त्यांच्या मृत्युपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून आमचे अशील १) वनमाला संभाजी वाघमारे २) बबलु संभाजी वाघमारे ३) राहुल संभाजी वाघमारे यांच्या नावे वारस म्हणून त्यांच्या नावाची नोंद सोलापूर महानगरपालिका येथील कर आकारणी कार्यालय येथे झालेली आहे. कै. संभाजी शिवाजी वाघमारे यांनी कै. विष्णु कृष्णा चौगुले यांना सदरची वर नमूद मिळकत ही यांना विनामोबदला तात्पुरत्या स्वरुपात राहण्याकरिता दिलेली होती. परंतु, कै. संभाजी वाघमारे यांनी सदरची मिळकत रिकामी करुन देण्यासाठी सांगितले असता कै. विष्णु कृष्णा चौगुले यांनी आज देतो उद्या देतो म्हणून मिळकत रिकामी करुन दिली नाही. दरम्यानच्या काळात त्यातच कै. संभाजी शिवाजी वाघमारे व कै. विष्णु कृष्णा चौगुले यांचे निधन झाले. त्यानंतर आमचे अशील यांनी कै. विष्णु चौगुले यांचे वारस १) सखुबाई विष्णु चौगुले, २) विनोद विष्णु चौगुले, ३) विजय विष्णु चौगुले यांना सदर वर नमूद मिळकत रिकामी करुन देण्यासाठी वारंवार सांगून देखील त्यांनी ही मिळकत रिकामी करुन दिली नसल्याने आमचे अशिलांनी त्यांना मिळकत रिकामी करुन देण्यासाठी वकीलामार्फत कायदेशीर नोटीस दिली होती. परंतु, नोटीस देवुन देखील त्यांनी मिळकत रिकामी करुन दिली नसल्याने आमचे अशिलांनी कै. विष्णु कृष्णा चौगुले यांचे वारसाविरुध्द सोलापूर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तरसो, सोलापूर यांच्याकडे स्पेशल दिवाणी दावा क्र. २४/२०२६ हा दावा दाखल केला आहे. मे. न्यायालयात दावा प्रलंबित असताना १) सखुबाई विष्णु चौगुले, २) विनोद विष्णु चौगुले, ३) विजय विष्णु चौगुले यांनी संगनमताने सदर वर नमूद मिळकत ही विक्री अथवा अन्यप्रकारे तबदिल करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमचे अशिलांना खात्रीलायक रित्या समजले आहे. म्हणून आमचे अशिलांनी ही सावधानतेची नोटीस देत आहेत. वर नमूद मिळकतीसंबंधी १) सखुबाई विष्णु चौगुले, २) विनोद विष्णु चौगुले, ३) विजय विष्णु चौगुले यांच्याशी खरेदी विक्री अगर अन्य कोणीही कोणत्याही प्रकारचे व्यवहार करु नये, याउपरही कोणीही त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचे व्यवहार केल्यास सदर व्यवहार आमचे अशिलावर अथवा वर नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे दिशाभूल अथवा फसवणूक होवू नये म्हणून ही सावधानतेची नोटीस दिली ता. २६/०५/२०२६

सही/- ॲड. जुबेर अ. करीम खानमियाँ,
रा. प्लॉट नं. १०८/३, काजल नगर, होटगी रोड, सोलापूर मो. नं. ९३२५७७२३४९.
अशिलांतर्फे ॲडव्होकेट

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना विशेषतः मौजे मजरेवाडी, सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील लोकांना व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी, सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील मौजे मजरेवाडी येथील सर्व्हे नं. 136/अ/1/2/प्लॉट नं. 134 याची हद्द पूर्वपश्चिम एकूण 357.75 चौ.मी. अथवा 3850 चौ. फुट अशी खुली जागा. चतुः सिमा खालीलप्रमाणेः पूर्वेस : रस्ता, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. 84 व 89 सदर जागा संदीप श्रीधर हंचाटे यांचे खरेदी मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असून त्यांनी त्यांच्या वैयक्तिक अडचणीचे निरसन करण्याकरिता सदर जागा आमचे अशिलांना कायम खुषखरेदी करून देण्याचे ठरवून आमच्या अशिलांसोबत तोंडी व्यवहार केले आहेत. तसेच सदर जागा निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे. सबब, या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वर नमूद जागेवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, पोटगी, टाच, सरकारी व निम सरकारी बँक कर्ज, पतसंस्था, फायनान्स, सोसायटी बोजा असल्यास किंवा दान, बक्षीस, वहिवाट, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, जप्ती, मृत्यूपत्र, वारसपत्र, अधिकारपत्र अगर इतर कोणत्याही प्रकारे हक्क दिल्यास किंवा हस्तांतरण केले असल्यास अथवा सदर जागेबाबत कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 7 (सात) दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदोपत्रानिशी लेखी कळवावे, तसे न झाल्यास सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार चालणार नाही व ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिद्ध केली. सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली.
तारीखः 25/05/2026

सही/– ॲड. इक्बाल पी. शेख
बी.ए.,एलएल.बी. मु.पो. कुमठे, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर, महाराष्ट्र
मो.नं. 9922112294 अशिलातर्फे ॲडव्होकेट.
अशिल– स्वप्नील ईश्वरलाल शाह

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापुरातील तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, डि.।। व सब डि.।। सोलापूरपैकी तालुका उत्तर सोलापूरपैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील नेहरू नगर येथील जुना सर्व्हे नं. ३६०, यांसी नवीन स. नं. ३२/१अ याचे एकूण क्षेत्र ३००० चौ. फूट इतके असून यावर बांधण्यात आलेल्या "परिहार अपार्टमेंट" या नावाने संबोधल्या जाणाऱ्या सदनिका समूहामधील विंग ए मधील फ्लॅट नं. २०३, दुसरा मजला, याचे एकूण क्षेत्र ४९.३० चौ.मी. इतके असून यात एक हॉल/लिव्हिंग रुम, एक किचन रुम, एक बेडरुम, संडास बाथरुम, पॅसेज असे बांधकाम आहे. यांसी चतुःसीमा येणेप्रमाणे- पूर्वेस :ओपन स्पेस, पश्चिमेस : ओपन स्पेस, दक्षिणेस : फ्लॅट नं. २०२ विंग - ए, उत्तरेस : फ्लॅट नं. २०२ विंग-बी. अशा वर्णनाची वर नमूद मिळकत ही श्री. संतोष अमरेश्वर सालक्की, रा. ७/१४, नेताजी सुभाष नगर, विजापूर रोड, सोलापूर यांच्या स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असून सदरची मिळकत ही त्यांनी आमचे अशीलांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून तोंडी व्यवहार झालेला आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही, अशी हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, लिन, इजमेंट राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हिला हरकत न आल्यास आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली तारीख २५/०५/२०२६.

सही/– वसीम लालासाहेब शेख,
बी. ए., एलएल. बी. ॲडव्होकेट,
प्लॉट नं. ७, वजीर नगर, विजापूर रोड, सोलापूर-४१३००४.
मोबाईल नं. ९८९०४९०५३० / ९८५०७०६७८६
अशिलातर्फे ॲडव्होकेट

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील नागरिकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूरपैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर, सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील उत्तर कसबा येथील घरजागा यांसी सि.स.नं. १०३७ याचे क्षेत्र २०४ चौ.मी., सदर जागेत ४१४ चौ.फूट किंवा ३८.४७ चौ.मी. क्षेत्रात जुने विट, चुना, दगड, बडोद पत्रा असलेले सुमारे ५८ वर्षापूर्वीचे बांधकाम असून, बाकीची जागा खुली, यांसी चतुःसिमा पूर्वेस :- रस्ता, दक्षिणेस :- सि.स.नं. १०३८बी, पश्चिमेस :- सि.स.नं. १०२३बी, उत्तरेस :- सि.स.नं. १०३६/२, येणेप्रमाणे चतुःसीमेतील घरजागा आतील बांधकाम, दगड, माती वगैरे तदंगभूत वस्तुसह, इजमेंटच्या सर्व हक्कासह व वहिवाटीच्या सर्व हक्कासह. वर नमूद मिळकत ही श्री. राजेश कालिदास सुरवसे व श्री. संजय कालिदास सुरवसे यांच्या मालकीची व कबजेवहिवाटीची आहे, त्यांनी आमचे अशिलांना खुषखरेदी देण्याचे ठरवून, त्यांना साठेखत लिहून दिले आहे. सदरची जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिलांना दिली आहे. तथापि, सदर मिळकतीवर कोणाचाही खरेदी, करार, गहाण, दान, टाच, जप्ती, पोटगी वगैरे वा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ (८) दिवसात आमचे खालील पत्त्यावर समक्ष भेटून आमचे अशिलांना खात्री पटवून द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. ही जाहीर नोटीस दिली ता.२५/०५/२०२६.

सही/– एस. व्ही. गेंट्याल
बी.एस.एल., एलएल.बी. ॲडव्होकेट
शॉप नं. १, रुक्मिणी शॉपिंग सेंटर, गेंट्याल टॉकिजशेजारी, उत्तर सदर बझार, सोलापूर.
मो. नं. ९९७०९४८९१८
अशिलातर्फे ॲडव्होकेट

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना व वित्तीय संस्थांना विशेषतः मौजे नागनहळ्ळी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे नागनहळ्ळी, तालुका अक्कलकोट येथील शेतजमीन गट नं.६३/२ यांसी क्षेत्र १ हेक्टर ०० आर आकारणी रु.१.६७ पै. ही संपूर्ण मिळकत चंद्रकांत अंबाराव पाटील यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत विक्रीस काढली असता, आमचे अशील श्री. अभिषेक शिवाजी पाटील यांनी देऊ केलेली किंमत ही बाजारभावाप्रमाणे सर्वात जास्तीची असल्याने त्यांनी सदरची मिळकत आमच्या अशिलांना कायमस्वरुपी खुषखरेदी देण्याचे ठरवून त्यापोटी त्यांचेकडून इसारादाखल रक्कम ही स्विकारली आहे. तसेच सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिली आहे. तरी वर नमुद मिळकतीबाबत कोणाचीही कसलीही तक्रार, हक्क अथवा हितसंबंध, उदा- खरेदी, साठे खत, गहाण खत, दान, बक्षीस, पोटगी, अंगवस्त्र, दावा, अपील, इजमेंटरी राईट, लिज, सावकारी करारपत्र अथवा अन्य कोणताही हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात कळवून कागदोपत्री पुराव्यानिशी आमचे अशिलाची खात्री पटवावी. वरील मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास, कोणाचीही कसलीही तक्रार नाही, असल्यास ती त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिली आहे असे समजून आमचे अशिल ठरलेल्या दिवशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची सक्तरित्या नोंद घ्यावी. येणेप्रमाणे खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली तारीख २६/०५/२०२६.

सही/– ॲड. विजय अ. हर्डीकर
ॲड. अजय दि. माढेकर
रा. फत्तेसिंह चौक, अक्कलकोट, जि. सोलापूर. मो. नं. ९८५००४८१८१.
अशिलातर्फे ॲडव्होकेट

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that, Shri. Samir Amrut Gandhi the owner of the land bearing City Survey No. 8306/1/B Railway Lines Admeasuring Area 827.02 Square Meter. The owner of land construct building "KIMAYA PRIME" First Floor & Second Floor The owner has assured my client that the said Show Room No. 2 is free from any encumbrances, lease, lien or hold and has clear marketable title. Any person or persons (which means and includes Individuals, Firms, Companies, Association of person statutory bodies/entities or any other authorities, etc.) having any share, right, title, interest, claim, demand or objection in respect of the said land mentioned in the Schedule hereunder written or any part thereof, as and by way of ownership, sale, exchange, transfer, lease, sub-lease, mortgage, gift, tenancy, leave and license, trust, inheritance, bequest, possession, maintenance, hypothecation, charge, lien, easement, litigation, disputes of whatsoever nature are or otherwise or any other rights or interests of whatsoever nature, are hereby called upon to make the same known in writing to the undersigned at the address mentioned herein below within 07 (Seven) days from the date of publication here of with documentary proof/evidence or Court Orders thereof for any such purported claim/objection, otherwise such claim or demand shall be deemed to have been waived to all intents and purposes. If no claim or objection is received as mentioned herein above, My Client will complete the procedure of sale of on its own merits without making any reference or regards to any such purported claim or interest which shall be deemed to have been waived for all intents and purpose and the same shall not be binding upon my client. SCHEDULE - All That Piece and Parcel of land Situated at, Railway Lines Solapur within the Solapur Municipal Corporation Area Taluka: North Solapur, Dist. Solapur bearing City Survey No. 8306/1/B Railway Lines Admeasuring Area 827.02 Square Meter land construct building "KIMAYA PRIME" First Floor & Second Floor Show Room No.2. Total Carpet Area (As Per Supplementary Deed of Declaration 2026) 200.80 Square Meter and 24.37 Square Meter Balcony Which is bounded by:- East: Shop No.3, West: Shop No. 1, South: Parking Area, North: Road. This public notice dated : 26/05/2026.

Sd/- Adv. Sumeet S. Raghoji
M.B.A, LL.B.
Office: Shop No. B-23 Shri Siddheshwar Market Yard, Mahaveer Co-Operative Bank Front Lane, Solapur-413005. Cell No: 9404477777.

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन- डि. व सब डि. सोलापूरपैकी तालुका उत्तर सोलापूर तसेच सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मौजे दहिटणे येथील सर्व्हे नं. १८/२/अ प्लॉट नं.३० यासी एकूण क्षेत्र १६२.१३ चौ. मी. किंवा १७४४.५१ चौ. मी. ची खुली जागा. यासी चतुःसीमा– पूर्वेस - प्लॉट नं. ३१, पश्चिमेस - प्लॉट नं. ३४ चे उर्वरीत क्षेत्र, दक्षिणेस – रस्ता व उत्तरेस - प्लॉट नं. ३५. येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत व त्यातील तदंगभूत वस्तुसह. वर नमूद मिळकत ही अब्दुल कादीर, करीम इनामदार व रमजान करीम इनामदार यांचे मालकी व कबजेवहिवाटीची मिळकत आहे. त्याप्रमाणे त्यांनी वर नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी अशी हमी आमचे अशिलांना दिलेली आहे व वर नमूद मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवले व त्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तसेच सदरहू मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळाही आमचे अशिलांना त्यांनी दिलेला आहे. तथापि, सदर मिळकतीबाबत कोणाचीही जप्ती, टाच, दान, गहाण, बक्षीस, साठेखत, करार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० (दहा) दिवसात खालील नमूद पत्त्यावर लेखी हरकत कागदोपत्रानिशी कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदी करतील, मग कोणाचीही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तो आमचे अशील यांचेवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. ही जाहीर नोटीस दिली ता. २६/०५/२०२६.

सही/– ॲड. सोमनाथ चंद्रशेखर वळसंगे,
ॲड. स्वप्ना एस. वळसंगे,
बी. एस. एल., एलएल. बी. ॲडव्होकेट
१५/१अ, गुमास्ता हौ. सोसायटी, स्वामी समर्थ मंदिराच्या पाठीमागे, शेळगी, सोलापूर मो.नं. ९८८१६०९४०५.
अशील– रिजवान तांबोळी